**फौ.कि.अ.क्र.३५/२०२४**

**राधा जाधव –वि– रावसाहेब जाधव**

**निशाणी क्र. ५**

**अर्जदार राधा रावसाहेब जाधव यांचा शपथेवर ज्यादाचा सरतपास अर्जदाराचे विधिज्ञ श्री. डी. एस. वाघ यांच्यातर्फे सुरु**

१. मी प्रस्तुतकामी सा.वाला यांच्या मालकीचे पालखेड व कुंभारी ता. निफाड येथील गट नं. ३०७, गट नं. १२६, गट नं. १२७, गट नं. १४३, गट नं. १४४/२, गट नं. १५८, गट नं. १९०, गट नं. २६१ व गट नं. ४५२ चे ७/१२ उताऱ्यांच्या संगणकीकृत प्रती दाखल केलेल्या आहेत. त्यांना **निशाणी १५ ते २३** देण्यात येते.

ज्यादाचा सरतपास पूर्ण

उलटतपास सा.वाल्यांचे वकील श्री. एस. के. पवार यांच्यातर्फे शपथेवर सुरु

२. माझे शिक्षण इयत्ता १२ वी पर्यंत झालेले आहे. अर्जदार क्र. २ ची जन्मतारीख दि.०४.०९.२०१६ अशी आहे. अर्जदार क्र. ३ ची जन्मतारीख दि.३०.०१.२०२० अशी आहे. सा.वाला क्र. २ चे वय ६५ वर्षापेक्षा जास्त आहे. सा.वाली क्र. ३ चे वय ५५ ते ६० च्या आसपास आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की सा.वाला क्र. १ हा माझ्या सासु–सासऱ्यांचा एकुलता एक मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या सासु–सासऱ्यांची जबाबदारी सा.वाला क्र. १ वर आहे. हे म्हणणे खरे आहे की सा.वाले लग्न जमल्यानंतर आमच्याकडे अवास्तव सोन्याची व घरातील वस्तुंची मागणी करत होते. मात्र त्याबाबत मी व माझ्या आईवडीलांनी त्यावेळी त्यांना नकार दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की तसेच माझ्या नातेवाईकांनी देखील विवाहाला नकार दिला नाही.

४. माझ्या प्रतिज्ञापत्रातील सर्व माहिती मी सांगितल्यानुसार लिहिलेली

आहे व माझे प्रतिज्ञापत्र माझ्या सांगण्यानुसारच तयार केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या आईवडीलांची परिस्थिती हलाखालीची असल्यामुळे माझ्या लग्नावेळी माझ्या आईवडीलांनी मला कोणतेही सोन्याचे दागिने घातले नाही. हे म्हणणे खरे आहे की आमच्या समाजामध्ये मुलींचे प्रमाण कमी आहे. साक्षीदार स्वतःहून सांगते की आमच्या लग्नावेळी तशी परिस्थिती नव्हती. हे म्हणणे खरे नाही की सा.वाल्यांनी आमच्या लग्नासाठी माझ्या आईवडीलांना आर्थिक मदत केलेली आहे. आमचे लग्न माझ्या वडीलांच्या शेतामध्ये घरासमोर झाले होते.

५. लग्नानंतर सा.वाल्यांनी माझ्या माहेरच्यांनी त्यांचा व्यवस्थित मानपान केला नाही, सोन्या–चांदीचे दागिने दिले नाहीत, रोख स्वरुपात हुंडा दिला नाही असे म्हणून माझ्या आईवडीलांबाबत अपशब्द वापरत होते त्याची नेमकी तारीख मला सांगता येणार नाही. साक्षीदार स्वतःहून सांगते की लग्नानंतर ४ ते ५ महिन्यांनी सा.वाल्यांनी मला असे अपशब्द वापरले होते. सा.वाल्यांनी मला रात्री–बेरात्री मारहाण केली, मला उपाशी ठेवले, काबाड कष्टाची कामे सांगत होते, पांघरण्यास कपडे–लत्ते देत नव्हते, उष्ट खरकटे व शिळे अन्न खायला भाग पाडत होते, माझ्या चारित्र्यावर संशय घेत होते असे माझ्या अर्जामध्ये व पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये नमूद केले आहे. मात्र त्याची नेमकी तारीख मला सांगता येणार नाही. या घटनांबाबत मी पो.स्टेशनला कोणतीही तक्रार केली नाही.

६. हे म्हणणे खरे नाही की प्रस्तुत प्रकरणामध्ये मी सा.वाला क्र. २ वर जे अश्लील आरोप केलेले आहेत ते सदर प्रकरणाचे गांभिर्य वाढवण्यासाठी केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की मी सा.वाला क्र. २ वर केलेले सर्व आरोप हे धादांत खोटे आहेत. हे म्हणणे खरे आहे की अर्जदार क्र. २ च्या जन्माआधी मला सा.वाला क्र. १ पासून दिवस गेले होते. हे म्हणणे खरे नाही की मी स्वतः माहेरी जाऊन त्यावेळी गर्भपात करुन घेतला होता. मी

अर्जदार क्र. २ वेळी जेव्हा गर्भवती होते तेव्हा मी उपचार सप्तश्रृंगी हॉस्पीटल, मौजे पालखेड, ता. निफाड येथे घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळी माझ्यासोबत सा.वाला क्र. १ येत होता. माझे सासर ते सप्तश्रृंगी हॉस्पीटल, मौजे पालखेड, ता. निफाड हे अंतर साधारणतः २ किमी आहे. पालखेड ते भयाळे हे अंतर साधारणतः १५ किमी आहे. चांदवड ते भयाळे अंतर २० किमी आहे. हे म्हणणे खरे आहे की चांदवडपासून माझे सासर कुंभारी साधारणतः ३० किमी अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की मी जेव्हा उपचारासाटी सप्तश्रृंगी हॉस्पीटल, मौजे पालखेड, ता. निफाड व अन्य ठिकाणी दवाखान्याला जायचे तेव्हा त्याचा सर्व खर्च सा.वाला क्र. १ करत होता. माझ्या उपचारासाठी माझ्या वडीलांनी पैसे खर्च केले हे दाखवणारे कागदपत्र मी प्रस्तुतकामी दाखल करु शकते. माझ्या दोन्ही डिलेवरीचे दवाखान्याचे बिल मी दाखल करण्यास तयार आहे.

७. हे म्हणणे खरे आहे की सा.वाल्यांना धडा शिकवण्यासाठी त्यांच्याविरुद्ध पो.स्टेशनला तक्रार द्यायला पाहिजे असे माझ्या व आईवडीलांमध्ये संगनमताने ठरले होते. हे म्हणणे खरे नाही की आमच्यामध्ये ठरल्यानुसार मी सा.वाल्यांविरुद्ध खोट्या तक्रारी पो.स्टेशनला दिल्या. हे म्हणणे खरे आहे की दि.२२.०५.२०१७ रोजी पिंपळगाव बसवंत येथे शंभर रुपयेच्या स्टँपवर करारनामा करण्यात आलेला होता. हे म्हणणे खरे आहे की त्यावर पक्षकार क्र. १ म्हणून माझे सासु–सासरे होते. मी व माझे पती पक्षकार क्र. २ म्हणून होतो. हे म्हणणे खरे आहे की त्या करार पत्रातील मजकूर आमचा संसार सुखाचा व्हावा यासाठी आमच्या व सा.वाल्यांच्या समजूतीने लिहिलेला आहे. त्यावेळी तेथे माझे वडील उपस्थित होते. हे म्हणणे खरे आहे की तो करारनामा करण्यापूर्वी मी माझ्या माहेरी राहत होते. हे म्हणणे खरे आहे की त्या करारपत्रामध्ये माझे व सा.वाला क्र. १ चे भांडण झाले तर त्यामध्ये माझ्या सासु–सासऱ्यांचा

कोणताही संबंध राहणार नाही असे लिहिलेले होते.

**मध्यंतराची वेळ झाल्याने उलटतपास तहकुब**

**अर्जदार तसेच सा.वाला यांच्या विधिज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.12.09 15:52:25 +0530

**दि. ०९.१२.२०२५**

**(वृषाली दी. सुंगारे)**
**सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**क.स्तर चांदवड.**